फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५२/२०२० मधील नि.क्र. २० वरील आदेश.
**(CNR-MHAH** २१-०००२८९-२०२०**)**

अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. सामनेवाला क्रमांक ०१ यांनी अर्जात कथन केले आहे की, सदरील मुळ अर्ज अर्जदार यांनी त्यांचेविरूध्द महिलांचे संरक्षण घरगुती हिंसाचारापासून अधिनियम, २००५ चे कलम १२ आन्वये दाखल केलेला आहे. सदर अर्जाची नोटीस सामनेवाला यांना मिळाल्यानंतर ते सदर प्रकरणी स्वतः वकिलांमार्फत हजर झालेले आहेत. तसेच सामनेवाला यांस सदर अर्जाचे कामी वेळेत म्हणणे देणे आवश्यक होते. परंतु, दरम्यानचे काळात सामनेवाला क्रमांक ०२ हे त्यांचे महत्वाचे कामानिमित्त पुणे येथे गेले असल्याने त्यांना सदर प्रकरणात त्याचे मुदतीमध्ये म्हणणे सादर करता आले नाही. त्यामुळे दिनांक ०८/१२/२०२१ रोजी निशाणी क्रमांक ०१ वर सामनेवाला क्रमांक ०२ यांचे विरुद्ध 'विना म्हणणे' चा हुकूम पारीत करण्यात आला. अर्जदार व सामनेवाला यांचेविरुध्दचा वाद हा कौटुंबिक स्वरूपाचा असुन अशा परिस्थितीत सामनेवालास सदर प्रकरणी त्यांची म्हणणे देता न आल्यास सामनेवाला यांना सदरचे अर्जात त्यांची बाजु मांडणे अशक्य होवुन या सामनेवालाचे कधीही न भरून येणारे अपरिमीत असे मोठे नुकसान होईल. या सर्व परीस्थितीचा विचार करता सामनेवालाविरुध्द झालेला 'विना म्हणणे' आदेश रद्द होवून म्हणणे स्वीकारण्यात यावे असे सामनेवालाचे कथन आहे.

३. अर्जदाराने त्याच अर्जावर म्हणणे देवून निशाणी क्रमांक २० येथील अर्ज जास्तीत जास्त खर्च अर्जदार यांना देण्याचे अटीवर मंजूर करण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे कथन केले.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, सामनेवाला यांना नोटीस बजावणी झाल्यानंतर ते दिनांक १६/०३/२०२० रोजी सदर प्रकरणात हजर झाले असून त्यांनी मुदतीत त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही परंतु, प्रस्तुतचा अर्ज दिनांक २८/०५/२०२५ रोजी म्हणजेच अर्ज पाच वर्षांपेक्षा जास्त विलंबाने दाखल करण्यात आला आहे. तसेच मुळ अर्जातील कथने व अर्जाची गुणदोषावर चौकशी

होण्यासाठी सामनेवालाचे म्हणणे दाखल होणे व त्यांची बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे सामनेवाला क्रमांक ०२ यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच सामनेवालास म्हणणे देण्यास झालेला उशिर हा अर्जदारास त्याबाबतचा खर्च देण्याचे अटीवर मंजूर करता येणे शक्य आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आ दे श

१. निशाणी क्रमांक २० येथील अर्ज, सामनेवाला क्रमांक ०२ यांनी अर्जदारास रक्कम रुपये ५००/- खर्च देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची पुर्तता झाल्यानंतर, सामनेवाला यांनी दिलेले म्हणणे वाचुन नोंदविण्यात येईल.

**सही/–**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक २),
जामखेड.

दिनांक:– १९/०८/२०२५
ठिकाण:– जामखेड